REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 10 | JULY - 2018

# महात्मा गांधीजींचे शैक्षणिक विचार

**प्रा. डॉ. रावसाहेब ढवन**
**लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर.**

**प्रस्तावना : -**



शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे एक प्रभावी साधन आहे. समाजाच्या सांस्कृतिक व सामाजिक विचार प्रवाहांना सुयोग्य वळण देण्याचे काम शिक्षणाचे आहे. मनुष्याची अस्मिता आणि अस्तित्व शाबूत ठेवून त्याला स्वावलंबनाने, स्वाभीमानाने आणि सुखाने जगण्याचा मार्ग दाखविणे हे शिक्षणाचे सर्वात महत्वाचे कार्य आहे. आज झपाट्याने बदलणा-या जगामध्ये आपले अस्तित्व सिद्ध करण्यासाठी शिक्षणाची नितांत गरज आहे. ही गरज भागविण्याचे काम शिक्षण जसे आजच्या काळात करीत आहे. तसेच प्राचीन काळापासून हे कार्य चालत आलेले आहे. व त्यात अनेक शैक्षणिक संप्रदायांचा तसेच अनेक शैक्षणिक तत्वज्ञानाचा व तत्वज्ञांचा हातभार लागलेला आहे.

शैक्षणिक तत्वज्ञानाचा विचार करता पाश्चिमात्य शिक्षणतज्ञांनी शैक्षणिक तत्वज्ञानाच्या निसर्गवाद, कार्यवाद, व आदर्शवाद या संप्रदायात घातलेल्या बहुमोल विचारांची भर व त्यांची कामगिरी निर्विवाद आहे. पण भारतीय संस्कृती, भारतीय अस्मिता, व आजच्या परिस्थितीत स्वातंत्र्योत्तर काळातील राष्ट्रीय शिक्षणपद्धतीला बहुमोल मार्गदर्शन करण्याकरिता समर्थ आहेत. भारतामध्ये अनेक शिक्षणतज्ञ होऊन गेले. उदा. रविंद्रनाथ टागोर, स्वामी विवेकानंद, महात्मा फुले, कर्मवीर भाऊराव पाटिल, महर्षी धोंडो केशव कर्वे व महात्मा गांधी. त्यांनी आपल्या जीवनविषयक व शैक्षणिक तत्वज्ञानाने भारतातील शिक्षणपद्धतीवर प्रभाव टाकला. त्यातील शिक्षणातील थोर विचारवंत शिक्षणतंज्ञ महात्मा गांधी यांच्या शैक्षणिक तत्वज्ञानाचा आढावा प्रस्तुत शोधनिबंधात घेण्यात आला आहे.

''साधी राहणी आणि उच्च विचारसरणी'' याचे उत्तम उदाहरण म्हणजे राष्ट्रपिता महात्मा गांधी होय. स्वातंत्र्य संग्रामात अहिंसेचा मार्ग जोपासणारी, सत्याचा आग्रह धरणारी, भारतमातेला स्वतंत्र करण्यासाठी तळमळणारी व्यक्ती केवळ राजकीय क्षेत्रातच सक्रिय नव्हती, तर स्वतंत्र्य भारताला विकसित करण्यासाठी शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. हे जाणून शैक्षणिक क्षेत्रातही तेवढीच सक्रिय होती. एका निर्धन राष्ट्राला शिक्षणातून स्वावलंबी, सज्ञान, व सतेज बनविण्यासाठी गांधीजींनी जी नवी शिक्षण योजना राष्ट्राला दिली त्यातच त्यांचे युग प्रवर्तक आहे. आज आपणाला स्वातंत्र्य मिळून 62 वर्षे झाली, तरीदेखील शिक्षणपद्धतीत फारसा बदल न करताच आपण पुढे जात आहोत. खरे पाहता गांधीजींनी जी ही योजना देशाला दिली, त्यातच तिचे मोठेपण सामावलेले आहे. म्हणूनच गांधीजी आपल्या काळातील एक श्रेष्ठ शिक्षणतज्ञ होते हे मान्य करावे लागेल. गांधीजींनी भारतीय संस्कृतीच्या आदर्शाला उजाळा देवून काही वेळेस त्यांचा नवा अर्थ लावून. त्याचा आधुनिक काळातील समस्यांशी व विचारांशी मेळ घालण्याचा यशस्वी प्रयत्न केला, म्हणूनच जॉन ड्युईसारख्या पाश्चात्य शिक्षणतज्ञाला देखील म्हणावे लागले की, '' गांधीजींची शिक्षणपद्धती ही इतर सर्व शिक्षणपद्धतीच्या पुढचे पाऊल आहे. असे मला खात्रीने वाटते. तिच्यात प्रचंड सुप्त सामर्थ्य आहे आणि या क्रांतिकारक शिक्षण प्रयत्नातून भारतापासून आम्हाला पुष्कळ शिकता येईल. अशी मला आशा आहे. ''

**अशा या थोर शिक्षणतज्ञ म. गांधीचे शैक्षणिक तत्वज्ञान पुढीलप्रमाणे -**

म. गांधीच्या शैक्षणिक तत्वज्ञानात निसर्गवाद, आदर्शवाद, वास्तववाद व कार्यवाद अशा चारही पंथांचा सुरेख समन्वय झालेला दिसून येतो. शिक्षणाने गतिशिल समाजाच्या गरजा लक्षात घेतल्या पाहिजेत. सामाजिक व आर्थिक बदल घडून येत असलेल्या समाजापासून शिक्षण दूर राहू शकत नाही. असे त्यांचे मत होते. शिक्षणाच्या प्रक्रियेत हाताचे सुयोग्य स्थान पहिल्यांदा, गांधीजींनीच निर्धारीत केले. हीच त्यांच्या शैक्षणिक तत्वज्ञानातील शिक्षण क्षेत्रास मिळालेली एक देणगी म्हटली पाहिजे.

1) **केवळ अक्षर ओळख म्हणजे शिक्षण नव्हे –**

अक्षर ओळख होणे वा चार पुस्तके वाचता येणे हा शिक्षणाचा अगदीच मर्यादीत अर्थ झाला.
गांधीजींच्या मते केवळ अक्षर ओळख ही शिक्षणाची सुरवात नव्हे. पुस्तकी शिक्षण हे निरर्थक असून त्यामुळे व्यक्तीच्या सर्वांगीण विकास होणार नाही, याची त्यांना खात्री होती.

2) **शिक्षण म्हणजे सर्वांगीण विकास -**

''बालकाच्या शारिरिक, मानसिक व अध्यात्मिक अंगांची सर्वोत्कृष्ठ अभिव्यक्ति म्हणजे शिक्षण.''. 'By Education, I mean, drawing out of the best in child, body, mind & spirit'
शिक्षणाद्वारे बालकाची इंद्रिय निग्रह शक्ती वाढावी, त्याच्या नीतीमत्तेचा पाया दृढ व्हावा, तर्कशुध्द विचार करण्याची शक्ती त्याच्यामध्ये यावी, त्याचे मन संवेदनक्षम बनावे, त्याची सद्‌विवेक बुध्दी सदैव जागृत राहावी इ. बाबी साध्य होण्यासाठी शिक्षण योजना असावी असे गांधीजींचे मत होते. म्हणजेच बालकाचा सर्वांगीण विकास हेच शिक्षणाचे ध्येय असावे. असा त्यांनी पुरस्कार केला.

3) **चारित्र्य शिक्षण / चारित्र्य निर्मिती -**

ज्या शिक्षणाने विद्यार्थी चारित्र्यवान बनेल तेच खरे शिक्षण होय. जोपर्यंत चारित्र्याची घडण कशी करावी याचे ज्ञान विद्यार्थ्यांला होत नाही. तोपर्यंत त्याचे ज्ञान निरर्थक आहे. असे ते मानीत. मात्र हे ज्ञान पुस्तकापेक्षा शिक्षकाच्या वर्तनातून नकळत विद्यार्थ्याला मिळाले पाहिजे. शिक्षणातून बालक पावित्र्यपूजक व सत्यशोधक बनला पाहिजे, असे त्यांना वाटे. चारित्र्यसंपन्न व नैतिक मूल्ये आत्मसात केलेला विद्यार्थी निर्माण करणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट असले पाहिजे, असे ते आवर्जून सांगत.

4) **जी मुक्त करते ती विद्या -**

'सा विद्या या विभुक्तये' विद्या म्हणजे केवळ अध्यात्मिक ज्ञान व मुक्ती म्हणजे सुटका एवढाच त्या मंत्राचा अर्थ करून चालणार नाही. विद्येचा अर्थ आहे लोकोपयोगी पडणारे सर्व प्रकारचे ज्ञान आणि मुक्तीचा अर्थ आहे या जीवनातील सर्व प्रकारच्या गुलामगीरीतून सुटका करून घेणे. असे ते मानत. शिक्षणातून मनुष्य भयमुक्त झाला पाहिजे. कोणत्या गोष्टी व कोणते विचार ग्रहण करावेत, कोणते करू नयेत याची विवेक बुद्धी विद्यासाधनेतून विद्यार्थ्याला आली पाहिजे.

5) **ऱ्हदय वृत्तींचा संस्कार आणि सेवा -**

गांधीजींनी शिक्षणात समतोल विकासाला महत्व दिले होते. गांधीजींच्या मते बालकाचा शारिरिक विकास आणि अध्यात्मिक विकास यांच्या बरोबरच समान गतीने जर बुद्धीचा विकास झाला तरच बालकाचा मानसिक विकास योग्य तऱ्हेने होईल. ऱ्हदय वत्तीचे शिक्षण म्हणजे अध्यात्मिक शिक्षण असे त्यांना वाटे. गांधीजींच्या ऱ्हदयाच्या शिक्षणात शरीरश्रमालाही महत्वाचे स्थान दिले आहे. 'श्रमही राम हमारा' असे गांधीजी म्हणत. ऱ्हदयवृत्तीच्या शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना विद्यार्थीदशेतच सेवेचे धडे द्यावेत असे त्यांना वाटे. गरीबांची सेवा हीच ईश्वरसेवा असे समीकरम मांडून विद्यार्थ्यांचा आत्मा, शरीर व बुद्धी यांच्या शिक्षणाकडे केंद्रित केले पाहिजे.

**6) अर्थोत्पादन क्षमता -**

केवळ पुस्तकी शिक्षणातील दोष दूर करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या अर्थोत्पादन क्षमतेकडे विद्यार्थीदशेतच लक्ष द्यावे. या मनाचे गांधीजी होते. मात्र कोण्या गरीबाच्या शोषणातून निर्माण होणा-या द्रव्य निर्मितीला त्यांचा विरोध होता. शिक्षणाने विद्यार्थी आर्थिक दृष्टया जितका स्वावलंबी बनला पाहिजे तितकाच शील व चारित्र्यसंपन्न असला पाहिजे, म्हणूनच विद्यार्थ्यांची अर्थोत्पादन क्षमता सामाजिक न्यायावर आधारलेली असली पाहिजे असे त्यांना वाटे.

**7) संस्कृती शिक्षण -**

गांधीजी आचार व विचार, उक्ती व कृती यांतील समरूपतेला महत्व देतात. गांधीजींची संस्कृतीची कल्पना मनुष्याच्या वाणीवर आधारित होती. ''तुमच्या अंतर्यानी असलेली संस्कृती तुमच्या वाणीतून प्रतिबिंबीत झाली पाहिजे. तुम्ही पाहुण्यांशी कसे वागता, परस्परांशी कसे वागता आणि वडीलधारी माणसे, अध्यापक यांच्याशी कसे वागता यातून तुमची संस्कृती प्रकट झाली पाहिजे.''

गांधीजींनी संस्कृती शिक्षणात सामुदायिक जीवनाच्या शिक्षणाला महत्व दिले होते. शिक्षणातून परस्पर सहकार्याची भावना वाढीस लागली पाहिजे. कर्तव्य तत्परता विद्यार्थ्यांच्या अंगी आली पाहिजे.

**8) धार्मिक शिक्षण -**

गांधीजी खरे नीति शिक्षक होते, परंतु त्यांनी धर्म शिक्षणाला गौण स्थान दिले आहे. धार्मिक शिक्षणाची व्यवस्था करणे, त्यांना मान्य नव्हते. मात्र विद्यार्थ्यांमध्ये धार्मिक सहिष्णुवृत्ती वाढविण्यासाठी व शाश्वत नीतीमुल्यांबद्दल आदर निर्माण व्हावा म्हणून सर्व पंथाच्या, धर्माच्या आणि संतांच्या शिकवणूकीचा शिक्षणात अंतर्भाव करावा असे ते म्हणत. या धार्मिक शिक्षणातून नैतिक मूल्ये आणि चारित्र्य संवर्धन यांचा परिपोष झाला पाहिजे इकडे त्यांचा कटाक्ष होता.

**9) स्त्रीशिक्षण -**

गांधीजी स्त्री शिक्षणाचे कडवे पुरस्कर्ते होते. आपले हक्क सुरक्षित राखण्यासाठी स्त्रियांना शिक्षणाची जरूरी आहे असे ते मानीत. पुरूष स्त्री यांचा दर्जा गांधीजी समान मानीत. स्त्रीयांनी शिक्षणातून दयेच्या देवता बनावे अशी त्यांची अपेक्षा होते. स्त्रियांचा अभ्यासक्रम घटाशी संबंधित असावा असे ते मानत. गृहसजावट, बालसंगोपन व बालुशिक्षण याविषयी विशेष ज्ञान स्त्रीला असले पाहिजे. पुरूषाला जशी शिक्षणाची गरज आहे, त्याहून आधिक गरज स्त्रीला आहे. कारण कोणत्याही कुटुंबातील एक पुरूष शिकला तर केवळ तो स्वतःच शिकला, परंतु एक स्त्री शिकली तर सर्व कुटुंबच शिकल्यासरखे आहे. म्हणून गांधीजी स्त्रीशिक्षणावर अधिक भर देतात.

**10) प्रौढ शिक्षण -**

आपल्या देशातील अज्ञान, अंधश्रद्धा, व्यावहारिक ज्ञानाचा अभावामुळे अनेक लोक निरक्षर आहेत त्यामुळे कोणीही अनोळखी व्यक्ती त्यांचे शोषण करतो. अशा प्रौढांना केवळ अक्षरज्ञान दिले म्हणजे त्यांचे शिक्षण संपले असे होत नाही. त्यांना रोजच्या व्यवहारात उपयोगी येईल असे शिक्षण दिले पाहिजे. त्यांच्या शिक्षणात बुद्धी व श्रम यांची सांगड घातली पाहिजे. गांधीजींना माहित होते. जोपर्यंत शेतकरी व कामकरी शिकत नाहीत तोपर्यंत तो स्वराज्याची मागणीही करू शकत नाही. म्हणून खेड्यापाड्यातील शेतकरी वर्ग शिकला पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. त्यासाठी लोकशिक्षकाने लोकांची सेवा व शिक्षणाची जबाबदारी घ्यावी. तसेच विद्यार्थी वर्गाने सुट्टीच्या काळात खेड्यात जाऊन हे लोकशिक्षणाचे कार्य करावे. खेडुतांना शिकविणे म्हणजे त्यांचा सर्वांगपरिपूर्ण विकास साधणे हाच प्रौढ शिक्षणाचा खरा अर्थ त्यांना अभिप्रेत होता.

**11) हरिजन शिक्षण -**

शिक्षणाच्या बाबतीत धर्म, जात, गोत, पंथ, वर्ण व उच्चनीच हा भेदभाव नष्ट करून गांधीजींना सर्व समाजाला शिक्षण द्यावयाचे होते. म्हणून प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत शिक्षण देणा-या शाळा-कॉलेजचे दरवाजे हरिजनांसाठी उघडे राहिले पाहिजेत, अशी गांधीजींची इच्छा होती. हरिजनांना स्वच्छ पाणी द्या व चांगले शिक्षण द्या असा गांधीजींचा आग्रह होता. हरिजनांना प्राथमिक शिक्षण देताना कसे खावे, कसे बसावे, कसे कपडे घालावेत, नाक.कान,दात,नखे व डोके यांची निगा कशी राखावी व आपली शाळा व घर कसे स्वच्छ ठेवावे. या गोष्टींचे शिक्षण

द्या . थोडया वरच्या वर्गामध्ये चांगल्या रीतीभाती, स्वच्छ वाणी, चांगले शिष्टाचार व चांगली वागणूक या गोष्टींचे शिक्षण द्यावे असे गांधीजींचे मत होते.

**12) लैंगिक शिक्षण -**

गांधीजींच्या मते मुलांना जननेंन्द्रियांचे कार्य व उपयोग याबद्दल माहिती देणे आवश्यक आहे, योग्य वेळी अशी माहिती दिली गेली नाही तर मुले वामचरनाला प्रवृत्त होतात, त्यासाठी त्यांना लैंगिक शिक्षण देणे गरजेचे आहे. लैंगिक शिक्षणाचा प्रमुख हेतू कामवासनेवर विजय मिळविणे किंवा कामप्रवृत्तीचे उन्नयन करणे हा असला पाहिजे. अशा शिक्षणाने मुलांच्या मनावर सहजपणे मनुष्य व पशु यांतील महत्वपूर्ण भेद कोणता आहे, हे त्यांच्या मनावर चांगले ठसेल. कामवासनेवर विजय मिळल्याशिवाय मनुष्याला स्वतःवर नियंत्रण राखता येणार नाही, आणि आत्मसंयमाखेरीज स्वराज्यही मिळणार नाही.

**13) सर्वोदयाची त्रिसुत्री -**

गांधीजीवर रस्कीनच्या तत्वज्ञानाचा प्रभाव होता. रस्कीनच्या प्रभावामुळेच सर्वोदयाचे सिध्दांत गांधीजींना जीवनात उतरवता आले. आपल्या आत्मकथेत सर्वोदयाचे सिध्दांत सांगितले आहेत.

1) सर्वांच्या कल्याणात आपले कल्याण आहे.
2) वकील काय किंवा न्हावी काय दोघांच्याही कामाची किंमत सारखीच असली पाहिजे, कारण पोटापाण्याचा हक्क दोघांनाही सारखाच आहे.
3) साधे अंगमेहनतीचे शेतकऱ्याचे जीवन हेच खरे जीवन होय.

गांधीजींच्या शिक्षण विषयक विचारात व शिक्षण योजनेवरही या सर्वोदयी विचारांचा प्रभाव पडला. या विचारांमुळेच महात्माजींनी सार्वत्रीक सक्तीच्या शिक्षणाचा पुरस्कार केला व आपल्या शिक्षण पद्धतीत साधेपणाला महत्व दिले.

**14) गांधीजींचे शैक्षणिक प्रयोग -**

गांधीजी पढिक किंवा सैद्धांतिक शिक्षणशास्त्री नव्हते. ते स्वअनुभवातून व प्रयोगातून आपल्या समोर येणा-या समस्यांची उकल करण्याचे मार्ग शोधणारे शिक्षणशास्त्री होते. त्यांनी आपले शैक्षणिक प्रयोग राबविण्यासाठी पाच आश्रमांची स्थापना केली. व प्राचीन ऋषींच्या आश्रमाप्रमाणे आपल्या आश्रमात एक नवी शिक्षणपद्धती सुरू केली, ते आाश्रम पुढीलप्रमाणे-

| | | |
|---|---|---|
| 1) फिनिक्स वसाहत | - | आफ्रिका |
| 2) टॉलस्टॉय | - | आफ्रिका |
| 3) कोचरब येथील सत्यागृहाश्रम | - | अहमदाबाद |
| 4) साबरमती आश्रम | - | अहमदाबाद |
| 5) सेवाग्राम | - | शेगाव - वर्धा |

या आश्रमांतून सर्व धर्माच्या लोकांना प्रवेश दिला. कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला नाही. येथे औद्योगिक, वाडमयीन शिक्षण, भाषा विकास यावर भर दिला. तसेच त्यात त्यांनी स्वावलंबन, शुचिता, साधेपणा, सेवापरायणापता, ज्ञानोपासना, प्रयोगशीलता, तपस्या, उद्योग, स्वार्थत्याग, समता व चारित्र्यसंवर्धन इ. सर्वकालीन सदगुणांच्या जोपासनेवर भर दिला.

या सर्व आश्रमांचे परिशीलन केल्यास आपणास असे दिसून येईल की, सत्य, अहिंसा व प्रेम यासारखी शाश्वत मूल्ये त्यांनी प्रत्यक्ष जीवनामध्ये कशी आणता येईल हेच सप्रयोग दाखविले. तसेच याच काळात त्यांनी सुप्रसिद्ध अशी वर्धा शिक्षण योजना देशाला अर्पण केली.

## वर्धा शिक्षण योजना - समाज परिवर्तनाचे एक प्रभावी साधन

महात्मा गांधी खरोखरच द्रष्टे नेता होते. शैक्षणिक विकासाच्या नावाखाली तयार होणा-या सुशिक्षित बेरोजगारांचा प्रश्न, अशिक्षित , सुशिक्षित वर्गामध्ये वाढत जाणारे अंतर, परंपरागत हस्तोद्योगांचा व कुटीर उद्योगांचा वेगाने होत चाललेला ऱ्हास, सुशिक्षांतामध्ये शारिरीक श्रमाबद्दल काव्यबद्दल निर्माण झालेली अनास्था या गोष्टी लक्षात

घेऊन स्वतंत्र भारत घडवण्यासाठी एक स्वावलंबी, स्वकर्तुत्ववान, सतशील, सज्जन असा सुशिक्षित नागरिक घडविणे अत्यावश्य होते.

तत्कालीन शिक्षणपद्धतीमध्ये ते सामर्थ्य नसल्यामुळे असे नागरिक घडविण्यासाठी शिक्षणपद्धतीही संपूर्ण बदलली पाहिजे, यावर त्यांचा कटाक्ष होता. म्हणून इ.स. 1937 मध्ये गांधीजींनी आपले शैक्षणिक विचार एका परिषदेमध्ये शिक्षणतज्ञ तसेच थोर विचारवंत यांच्या समोर मांडले. त्यात डॉ. झाकीर हुसेन, नरेंद्र देव, आर्यनायकम, काका कालेलकर, दादा धर्माधिकारी, आचार्य विनोबा भावे इ. व्यक्ती उपस्थित होत्या. गांधीजींच्या शैक्षणिक विचारांच्या आधारे एक शिक्षणयोजना तयार करण्यात आली, त्यालाच वर्धा शिक्षण योजना असे म्हटले जाते.

ही शिक्षण योजना गांधीजींच्या सुंदर स्वप्नांपैकी सर्वात मोठे स्वप्न होते. गांधीजी म्हणत - ‘‘मैने हिंदुस्थानको आजतक तो बहुतसी चीजें दी है, न सबमे शिक्षाकी यह योजना और पध्दती सबसे बडी चीज है और मै नही मानता कि इससे ज्यादा अच्छी कोई चीज मै देशको दे सकुंगा |’’

या त्यांच्या वाद्यावरूनच ही शिक्षणयोजना किती महत्वपूर्ण होती, हे सांगण्याची गरज नाही.

या शिक्षण योजनेची वैशिष्टे पुढीलप्रमाणे -

1) **निःशुल्क व सक्तीचे शिक्षण -** 7 ते 14 वयोमर्यादा गटातील सर्व मुलामुलींना प्राथमिक शिक्षण सक्तीचे, निःशुल्क व सार्वत्रीक करण्यात आले.
2) **मातृभाषा हे शिक्षणाचे माध्यम -** गांधीजींच्या मते शिक्षण हे मातृभाषेतूनच दिली पाहिजे, कारण आपले विचार, विषयाबद्दलच्या संकल्पना स्पष्टपणे विकसित करण्यासाठी मातृभाषेतूनच शिक्षण देणे आवश्यक आहे. मातृभाषेतून शिक्षण हाच ख-या शिक्षणाचा पाया आहे, व त्यातून विद्यार्थ्यांच्या आत्मविकासास खरा वाव मिळतोअसे गांधीजी म्हणत.
3) **शिक्षणाचा केंद्रबिंदू हस्तव्यवसाय असावा -** कोणत्याही उत्पादनक्षम अशा हस्तव्यवसायालाच ते मुलोद्योग म्हणत. हा व्यवसाय त्या त्या प्रदेशातील मानवी जीवनाशी संबंधित असावा. उदा. समुद्रकिनाऱ्याच्या ठिकाणी राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मत्स्यव्यवसाय, नारळाच्या झाडापासून तयार होणाऱ्या वस्तूंचे उत्पादन, जाळी विणणे इ. तर सखल भागात राहणाऱ्या लोकांना कुक्कटपालन, सुतकताई, विणकाम, लाकडी खेळणी वगैरे व्यवसाय योग्य राहतील.
   शिक्षणाचा प्रारंभ हा अक्षर ज्ञानापेक्षा उत्पादक मुलोद्योगी हस्त व्यवसाय याद्वारा व्हावा. उद्योगाच्या माध्यमातून साहित्य, गणित, विज्ञान, चित्रकला, इतिहास, भूगोल या विषयांचे ज्ञान व्हावे.
4) **कृतिद्वारा शिक्षण -** गांधीजींच्या मुलोद्योगप्रधान शिक्षणात ‘Learning by doing, learning by earning.’ या तत्वाचे पालन केले जाते. या शिक्षणपद्धतीत उत्पादनाच्या क्रिया शास्त्रीय पद्धतीने शिकवल्या जात असल्याने उदयोगासंबंधित ज्ञान बालकाला होत होते, उद्योगपात्रता त्याच्यात निर्माण होते व उद्योगाबद्दल प्रेम निर्माण होते.
5) **नवनिर्माण क्षमतेला प्रेरणा -** गांधीजींच्या उद्योगप्रधान शिक्षणात कृतीला महत्वाचे स्थान होते. कृती म्हणजे बालकातील चैतन्याला संधी, बालकाच्या जिज्ञासेला निमंत्रण, बालकाच्या नवनिर्माण प्रज्ञेला प्रेरणा मिळते.
6) **शिक्षण स्वाश्रयी असावे -** गांधीजींच्या मते प्रत्येक शाळा ही स्वाश्रयी असावी. म्हणजे विद्यार्थी मूलोद्योगातून ज्या वस्तू तयार होतील त्या विकल्यानंतर येणा-या उत्पन्नातून शाळेचा खर्च चालवावा. शिक्षकांचे वेतन व इतर खर्चही त्यातूनच करावा. कारण सरकार भारतीय जनतेच्या शिक्षणावर पैसा खर्च करणार नाही याची पूर्ण त्यांना कल्पना होती.
7) **सामाजिक विकास -** वर्धा शिक्षण योजनेमध्ये उदयोगाद्वारा शिक्षण दिले जात असल्यामुळे बुद्धजीवी असे वर्ग निर्माण होत नाहीत. उद्योग करीत असताना विद्यार्थ्यांना एकमेकांबरोबर सहकार्य करणे भाग असते, त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक सहकार्य, न्याय व बंधुता यांची भावना वाढीस लागते. खरे पाहता वर्धा - शिक्षण योजनेचा हेतू निःशद्ध रक्तहीन सामाजिक क्रांती घडवून आणण्याचा होता. शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे एक प्रभावी साधन असल्याने वर्धा शिक्षण योजनेचे सामाजिक ध्येय सत्य, अहिंसा, प्रेम यावर अधिष्ठीत सहकार्य, समता व सहिष्णुता या तत्वांशी निगडीत लोकशाहीप्रधान नवसमाज निर्माण करणे हे होते.

8) **उत्पादननिष्ठा व श्रमप्रतिष्ठा -** समाजात परकीय शिक्षणाने शारीरिक व बौध्दीक ऱ्हास झाला होता. पोषाखीपणाची वाढ झाली होती. श्रमाविषयी लाज वाटत होती व समाजात बुद्धजीवी व श्रमजीवी असे दोन वर्ग निर्माण झाले होते. गांधीजींना या दोन वर्गातील दरी दूर करून आपली समराज्याची कल्पना प्रत्यक्षात उतरवायची होती, म्हणूनच शारीरिक श्रमाला त्यांनी प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. शारिरिक श्रमावर भर दिल्यामुळे विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वास वाढला व पुरूषार्थही जागविला.

9) **समवायाचे तत्व -** गांधीजींनी आपल्या शिक्षणपध्दतीत अध्ययनाच्या आशयाबरोबरच अध्यापनाच्या तंत्रामध्येही परिवर्तन घावून आणण्याचा प्रयत्न केला. 'उद्योग' शिक्षणाचे माध्यम बनल्याने त्या उद्योगाच्या अनुषंगाने इतर विषयांचे अध्ययन व त्यांचा संबंध अभिप्रेत बनले. गांधीजी शिक्षणाला अखंड प्रक्रिया मानत. समवाय म्हणजे नित्यसंबंध. उत्पादक उद्योगाचे माध्यमातून मुलोद्योग व शिक्षणप्रक्रिया यांचा संबंध जोडण्याचा तो एक प्रयत्न होता. शेती, कताई, अन्य व्यवसाय, समारंभ, सण, उत्सव, निसर्ग इ.च्या माध्यमातून अध्यापन केले जाणार असल्याने अध्ययनात अंतरिक शिस्त निर्माण होते. समवाय पद्धतीचे यशापयश शिक्षकावर अवलंबून राहते. शिक्षक उत्साही असेल, सामाजिक जीवनाची सर्वांगीण जाण असलेला असेल तर समवाय पद्धतीद्वारे जीवन शिक्षण यशस्वी करता येते, यासाठी शिक्षकाला विविध विषयांचे सखोल ज्ञान व परस्पर संबंध यांची जाणीव हवी.

गांधीजींनी अनेक अनुभवांनी संपन्न झाल्यानंतर जीवन शिक्षण योजना राष्ट्राला देणगी स्वरूपात दिली. परंतु या योजनेवर टीका - प्रतिटीका झाल्याने, शासनाच्या उदासीनतेमुळे शासकीय अधिका-यांच्या उपेक्षेमुळे ही योजना स्वातंत्र्योत्तर काळात मागे पडली.

एकंदरीत महात्मा गांधी प्लेये, रूसो, ड्युई यांच्याप्रमाणे शैक्षणिक तत्वचिंतक म्हणून मान्य होणार नसतील तरी गांधीजी व्यवहारवादी शिक्षणतज्ञ होते हे मान्यच करावे लागेल. गांधीजींनी शिक्षणाचा आर्थिक व नैतिक मूल्य प्राप्त करून दिले. "निर्धन राष्ट्राला त्याच्या साधनसंपत्तीशी मेळ घालणारी नवी योजना दिली. यातच सहकार्य व समतेवर आधारलेली योजना बनविणे यांतच त्यांचे क्रातिकारकत्व आहे. दीर्घ व व्यापक निरीक्षण, चिंतन व प्रयोग या मार्गांनी गांधीजींनी स्वतः शैक्षणिक अनुभव मिळवून वर्धा शिक्षण योजनेद्वारा भारतीय शिक्षणपध्दतीला नवी दिशा दिली.

## संदर्भग्रंथ -


1. भगत, रा.तु. ( 2005 ). ***शिक्षणातील थोर विचारवंत***. कोल्हापूर : चैतन्य प्रकाशन.
2. पवार, ना.ग. ( 1991 ). ***उद्योन्मुख भारतीय समाजातील शिक्षणतज्ञ***. पुणेः नूतन प्रकाशन.
3. अहेर, हिरा ( 1995 ). ***उद्योन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक*** . नागपूर : विद्या प्रकाशन.
4. मगदूम, आ.भा. आणि इतर (1978). ***शिक्षणातील दीपस्तंभ ( प्लेटो ते कर्मवीर भाऊराव पाटील )***. कोल्हापूर : युनिक पब्लिकेशन हाऊस .
5. अकोलकर, ग.वि. ( 1971 ). ***गांधीजींचे विचार*** . पुणे : चिरंजीव ग्रंथ प्रकाशन .
6. कुंडले, म.बा. ( 1979 ). ***शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र*** .पुणे :विद्या प्रकाशन.
7. गांधी, मो.क. ( 1969 ) ***मेरे सपनों का भारत*** .वाराणसीः सर्व सेवा संघ .
8. Mani, R.V.S. ***Educational Ideas of Gandhi & Tagore***
9. Prabhu & Rao ***The mind of Mahatma Gandhi***
10. Gandhi M.K. ***Basic Education***, Ahmedabad: Navajivan Publishing House.